जिल्हाधिकारी यांजकडून
जाहिर नोटीस

क.कक्ष-२०/स्थानि/अका नपनि / कावि ८२८ /२०१६ दिनांक ४/७/२०१६

राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेश क्र रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का-६ दिनांक १५ जून २०१६ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४०) (या सदर अधिनियम म्हणुन संबोधित केला) चे कलम १० (१) नुसार अमरावती जिल्हयाचे जिल्हाधिकारी निम्नोक्त आदेशाच्या अनुसुचीत दर्शविल्याप्रमाणे चांदुर रेल्वे,धामणगाव रेल्वे,मोर्शी,वरुड,शेंदुरजनाघाट,चांदुर बाजार,अचलपूर,दर्यापूर व अंजनगाव सुर्जी नगरपरिषद क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल या प्रभागाची संख्या व त्याची व्याप्ती निश्चित करण्याचे व ज्या प्रभागामधे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरीकांचा मागासप्रवर्गासाठी जागा राखुन ठेवता येतील ते प्रभाग आणि त्याच प्रमाणे स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरीकांच्या मागासप्रवर्गाचे स्त्रियांसह ) जागा राखुन ठेवण्यात येतील ते प्रभाग निर्दीष्ट करण्याचे ठरवित आहेत.

२) सदर अधिनियमाच्या कलम १० पोट कलम (१) परंतुकाप्रमाणे आवश्यक असल्यामुळे आदेशाचा मसुदा याव्दारे वरील नऊ नगर परिषद क्षेत्रातील सर्व रहिवाशांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असून याव्दारे सुचना देण्यात येते की, उक्त आदेशाचा मसुदा दिनांक ४ जुलै २०१६ (सोमवार) नंतर जिल्हाधिकारी अमरावती विचारात घेतील.

३) उक्त आदेशाचे मसुद्यास ज्या लोकांच्या काही हरकती असतील त्यांनी त्या हरकती सकारण दिनांक ०५/०७/२०६ ते १४/७/२०१६ पर्यत कार्यालयीन वेळेत किंवा तत्पूर्वी लेखी नगरपालीका प्रशासन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे सादर कराव्यात उक्त तारखेनंतर आलेल्या हरकती जिल्हाधिकारी विचारात घेणार नाही.

**आदेशाचा प्रारुप मसुदा**

ज्याअर्थी महाराष्ट्र नगर परिषदा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ९ (२) मधील मा.विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर पालिका प्रशासन, अमरावती यांनी केलेल्या क्र.प्रासनप्र/अका/कावि १८३/२०१६ दि. १३.०५.२०१६ च्या आदेशांन्वये त्यांनी नऊ नगर परिषदेच्या बाबतीत दर्शविल्या प्रमाणे निवडावयाची सभासदांची संख्या अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग यांच्या साठी राखुन ठेवावयाच्या जागा व स्त्रियांसाठी (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या जागा निश्चित केलेल्या आहेत.

१) अनुसुचीमध्ये नागरिकांचा मागासवर्ग त्याच प्रमाणे अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्गाच्या स्त्रियांसाठी राखुन ठेवलेले प्रभाग हे दि. २ जुलै २०१६ रोजी काढलेल्या चिठठया (लॉटस) प्रमाणे निर्दिष्ट करण्यात आलेले आहेत.

**२) नगर परिषद क्षेत्रात निवडावयाची सभासदांची संख्या, प्रभाग (आरक्षणासह) व प्रभागांची सिमा दर्शविणारे नकाशे सर्वांना कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी नगरपरिषद कार्यालय, तहसिल कार्यालय,नगरपरिषदेच्या संकेत स्थळावर,जिल्हाधिकारी कार्यालयातील (www.amravati.nic.In) या संकेत स्थळावर उपलंब्ध राहतील.**

दिनांक :- ४ जुलै २०१६

(किरण गित्ते )
जिल्हाधिकारी अमरावती